ARTHA
Poona 4.

Reg. No. B. 3434. Licence No. 53.
Licenced to post without prepayment.

अर्थशास्त्र, व्यापार, उद्योगधंदे, बँकिंग, सहकार, इत्यादि विषयांस वाहिलेलें एकमेव मराठी साप्ताहिक
स्थापना : १९३५

# अर्थ

"अर्थ एव प्रधानः" इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति।
—कौटिलीय अर्थशास्त्र

प्रत्येक बुधवारीं प्रसिद्ध होतें.
वर्गणीचे दर :
वार्षिक : ६ रु.
सहामाही : ३ रु.
किरकोळ : २ आ.
दुर्गाधिवास, पुणें ४.

वर्ष १८ पुणें, बुधवार तारीख १३ फेब्रुवारी, १९५२ अंक ७

## विविध माहिती

**सीलोनसाठी कांदे**—सीलोन सरकारनें मद्रास सरकारकडे प्रत्येक तिमाहीसाठी ५०० टन तांबड्या कांद्यांची मागणी केली आहे. सीलोनमध्यें तांबड्या कांद्यांचा बराच तुटवडा असून त्याला किंमतहि चांगली येत आहे. भारताचा सीलोनमधील व्यापारी कमिशनर मद्रास सरकारच्या उत्तराची वाट पहात आहे.

**सिंद्री येथील खताचा कारखाना**— सिंद्री येथील खताचा कारखाना गेल्या वर्षी आक्टोबरअखेर सुरू झाला. ता. ७ जानेवारी, १९५२ रोजीं सदर कारखान्यांत ३०० टन अमोनियम सल्फेट तयार झालें. रोज १,००० टन खत तयार करण्याची कारखान्याची शक्ति आहे. परंतु इतकें उत्पादन रोज होण्यास १९५२ चा मध्य तरी लागेल.

**मध्यवर्ती सरकारचा भांडवली खर्च**— भारतीय सरकारनें १९५२–५३ सालीं सुमारें १८० कोटी रुपयांचा भांडवली खर्च करण्याचें ठरविलें आहे असें समजतें. हा खर्च भारताच्या पंचवार्षिक योजनेशी जुळता करून घण्यांत आला आहे. अन्नधान्याच्या निर्मितीवरील खर्चाला प्राधान्य देण्यांत आलें असून त्याच्या खालोखाल निर्वासितांच्या पुनर्वसाहतीवर खर्च करण्यांत येणार आहे.

**इजिप्तचें व्यापारी धोरण**— ब्रिटन आणि इजिप्त ह्यांचे संबंध चिघळत चालल्यामुळें इजिप्तचें सरकार भारत, अतिपूर्वेकडील देश आणि युरोप ह्यांच्याशीं व्यापारी संबंध वाढविण्याच्या विचारांत आहे. जर्मनी, पूर्व–युरोप आणि रशिआ ह्या देशांशीं व्यापार करण्यांबाबत कांहीं पाऊलें टाकण्यांत आलीं आहेत. जर्मनीकडून कोळसा, लोखंड व यंत्रें घेऊन इजिप्त कापसाचा पुरवठा करणार आहे.

**निजामजवळील रत्नें**—हैद्राबादच्या निजामनें आपल्या रत्नभांडारापैकीं कांहींचा ट्रस्ट केला आहे. ट्रस्ट केलेल्या जवाहिराची किंमत सुमारें २५ लाख रुपये असून तें मुंबईला एका परदेशी बँकेच्या सेफ डिपॉझिट तळघरांत ठेवण्यांत आलें आहे. जवाहिर हैद्राबादहून एका खास विमानानें मुंबईला नेण्यांत आलें.

**माकडें विका व डॉलर्स मिळवा**—मध्यप्रदेशांतील माकडांची संख्या गेल्या वर्षांत द्विगुणानें वाढली आहे. माकडांचा उपद्रव फारच होऊं लागल्यामुळें त्यांच्याविरुद्ध उपाययोजनेचा विचार चालू आहे. माकडांना अमेरिकेला पाठविल्यास भारताला डॉलर्स मिळूं शकतील.

**मोटारींच्या आयातीस बंदी**— तयार मोटारींची भारतांत आयात करण्यास सध्या मनाई आहे, परंतु परदेशांहून येणाऱ्या उतारूंना कांहीं विशिष्ट अटींवर स्वतःजवळील सामान म्हणून मोटारी आयात करण्याची परवानगी आहे. या सवलतीनुसार यापुढें कोणत्याहि उतारूस मागील दोन वर्षांत त्यानें एखादी मोटार आयात केली असल्यास, सुलभ अगर डॉलर कोणत्याहि चलन विभागांतून पुन्हा आयात करण्यास परवानगी दिली जाणार नाहीं.

**नगरपालिकेच्या मांजरांचा खर्च**—व्हिएन्ना नगरपालिकेनें आपल्या नौकर–वर्गांत दोन मांजरें ठेवलीं आहेत. त्यांच्या खाण्यापिण्याच्या खर्चासाठीं मासिक ४ शिलिंगांची सोय अंदाजपत्रकांत करण्यांत आली आहे. त्या म्युनिसिपालिटीच्या नौकरांत पहारा करणारे कुत्रे आणि शिकारी कुत्रे ह्यांचाहि भरणा आहे.

**संयुक्त–राष्ट्र–संघटनेचा नौकर–वर्ग**—संयुक्त–राष्ट्र–संघटनेच्या नौकरवर्गापैकीं जे न्यूयॉर्क शहरांत रहातात, त्यांच्या रहाणीच्या भत्त्यांत ७·५ टक्के इतकी वाढ करण्यांत आली आहे. ह्या वाढीला रशिया, अमेरिका व ब्रिटन ह्या सर्वांनीं विरोध केला होता. पण तो निष्फळ ठरला. ह्या जादा खर्चासाठीं संघटनेला वार्षिक १०,००,००० डॉलर्सची सोय करावी लागेल.

**मुंबई राज्यांतील पेनिसिलिनचा कारखाना**— मुंबई राज्यांत पेनिसिलिन औषधाचा एक कारखाना भारतीय सरकार काढणार आहे. ह्या कारखान्यांत मुंबई सरकार सहभागी होणार नाहीं असें समजतें. मुंबई सरकार स्वतःच सल्फा औषधें काढण्याच्या तयारींत असल्यामुळें वरील निर्णय घेण्यांत आला.

**श्री. चिंतामणराव देशमुखांचें भाषाप्रभुत्व**—आनंद येथें फोर्ड फौंडेशन ट्रेनिंग सेंटरचें उद्घाटन मध्यवर्ती सरकारचे फडणीस श्री. देशमुख ह्यांनीं केलें. ह्या प्रसंगीं त्यांनीं गुजराथी, हिंदी व इंग्रजी भाषेंतून लागोपाठ भाषण केलें. श्रोतृसमुदाय बहुतेक गुजराथी होता व त्यानें श्री. देशमुख ह्यांचें कौतुक केलें.

**भारताचा केबलचा कारखाना**— चित्तरंजनच्या रेल्वे इंजिनांच्या कारखान्याजवळच भारतांतील पहिला केबलचा कारखाना काढण्यांत येणार आहे. जरूर त्या यंत्रसामुग्रीची मागणी नोंदण्यांत आली असून कारखान्याची जागा सपाट करून घेण्यांत येत आहे. प्रत्यक्ष उत्पादनास १९५३ च्या अखेरीस प्रारंभ होईल.

## मुद्रण धंद्याचें आत्मनिरीक्षण

### मुद्रण व्यवसायाची उन्नति कशी होईल ?

" आमच्या धंद्याचें शास्त्रशुद्ध शिक्षण मालकांना व कामगारांना देण्याचा पद्धतशीर प्रयत्न व्हावयास पाहिजे. तो जर झाला नाहीं, तर आपण आपली प्रगति कधींच करूं शकणार नाहीं. मुद्रणकला ही केवळ बौद्धिक कला नसून हस्तव्यवसायप्रधान कला असल्यामुळें इतरत्र कोठें काय चाललें आहे याचें प्रात्यक्षिक मुद्रण-मालक आणि कामगार यांना दिलें गेलें पाहिजे. इंजिनियरिंग कॉलेजांत आणि स्थापत्य शाळेंत शिकणाऱ्या विद्यार्थ्यांना निरनिराळ्या ठिकाणीं नेऊन प्रत्यक्ष बांधकामें दाखविलीं जातात, शेतकीच्या विद्यार्थ्यांना प्रायोगिक शेती दाखविली जाते, तद्वतच मुद्रकांनीं इतरत्र ठिकाणचे नामवंत छापखाने पाहणें हें उपयुक्त ठरेल असा विश्वास वाटतो. नवीन गोष्टी पाहिल्यानें व्यापक दृष्टिकोन होऊं शकतो. मुद्रणाकडे साधन म्हणून केवळ न पाहतां साध्याच्या दृष्टीनें पाहिलें तरच या धंद्याची उन्नति होईल. मुद्रणांतील शैक्षणिक दर्जा मान्य होण्याजोगी परिस्थिति आजवर नसल्यानें मुद्रकांच्यामध्यें एक प्रकारचा न्यूनगंड उत्पन्न झालेला दिसत आहे. एक माणूससुद्धां धंदा किती ऊर्जितावस्थेस नेतो याचें मूर्तिमंत उदाहरण म्हणजे नागपूर येथील श्री. धनवटे (शिवाजी आर्ट लिथो प्रेस) हें होय. दुसऱ्याच्या कर्जाच्या भांडवलावर व दोन-तीन कामगारांवर उभारलेल्या या छापखान्याचें आजचें भांडवल एक कोटीच्या घरांत आहे आणि तेथें पांचशें कामगार काम करीत आहेत. या छापखान्याची यंत्रसामुग्रीही अगदी अद्ययावत् असून श्री. धनवटे यांचे मुलगे, वडिलांच्या वयोमानामुळें, हा छापखाना जबाबदारीनें चालवीत आहेत. हा छापखाना लिथो व ऑफसेट छपाईत अखिल भारतांतच काय, पण आशिया खंडांत अग्रगण्य समजला जातो. अशा तऱ्हेचा आदर्श मुद्रकांच्या डोळ्यांपुढें नेहमीं येणें अत्यावश्यक आहे. धंद्यांतील मारक स्पर्धा कशी कमी होईल याचा विचार करून, व त्याचें ज्ञान इतरांना देण्याची तजवीज झाली, तरच असल्या घातक स्पर्धेपासून आपण लांब राहूं.

### पुण्यांतील छापखाने

"पुणें शहरांत असलेल्या छापखान्यांकडे बघतांना असें दिसतें कीं, येथें एकंदर १२४ छापखाने असून त्यांपैकीं ५५ छापखाने कारखान्यांच्या कायद्याखालीं येणारे आहेत ( १० पेक्षां जास्त कामगार असलेले ). या छापखान्यांतून १०७ सिलेंडर यंत्रें व १९४ ट्रेडलें आहेत. ६२ छापखाने हे केवळ ट्रेडलवरच काम करणारे असून दोन छापखाने केवळ सिलेंडर यंत्रावर काम करतात आणि राहिलेल्या बाकी छापखान्यांतून सिलेंडर व ट्रेडल यंत्रें आहेत. कामगारांच्या संख्येप्रमाणें पुढीलप्रमाणें वर्गवारी होते:—

| कामगार संख्या | छापखाने |
|---|---|
| १ ते १० | ६५ |
| ११ ते २५ | २९ |
| २६ ते १०० | २४ |
| १०१ च्या पुढें | ६ |

" या वर्गवारीवरून व ट्रेडल छापखान्यांच्या संख्येवरून असें दिसून येईल कीं लहान छापखान्यांचें प्रमाण फार मोठें आहे. या लहान छापखान्यांतून पुस्तकछपाईविरहित कामें ( जॉब ) केलीं जातात. शशिकांत, प्रकाश यांसारख्या कांहीं ट्रेडल छापखान्यांतून पुस्तक छपाईचें काम केलें जातें, पण तें अपवादात्मक स्वरूपाचेंच समजलें पाहिजे. साधारणतः २५ पेक्षां जास्त कामगार असलेल्या व सिलेंडर छापखान्यांतून पुस्तकछपाईचें काम केलें जातें. नेहमींची सामान्य यंत्रसामुग्री या सर्व छापखान्यांतून आहे. त्यांत उल्लेख करावयाचा झाल्यास आनंद, प्रतिभा, आर्यभूषण, कलागृह, ओरिएण्टल वॉचमन या छापखान्यांतून ऑटोमॅटिक यंत्रें आहेत. कलागृह छापखान्यानें चोवीस वर्षांपूर्वी छपाई, शिलाई व घडी पाडण्याचीं ऑटोमॅटिक यंत्रें आणलेलीं होतीं हें लक्षांत ठेवण्यासारखें आहे. ओरिएण्टल वॉचमन, या छापखान्यांत चवदा भाषांतील कंपोझिंग काम होतें हें वैशिष्ट्य आहे. त्या खालोखाल सहा भाषांतून काम आर्यभूषण प्रेसमध्यें होत असतें. छपाईचें काम सौंदर्यपूर्ण व कलात्मक दृष्टीनें करण्याच्या बाबतींत राजगुरु छापखान्यानें लौकिक संपादन केलेला आहे. आर्यभूषण, केसरी, समर्थभारत, लोकसंग्रह, चित्रशाळा हे छापखाने संस्थांच्या मालकीचे असून त्यांची धंद्यांतील भूमिका वेगळ्या स्वरूपाची असण्याचा संभव आहे. कांहीं चार पांच छापखाने कंपन्यांच्या मालकीचे आहेत आणि बाकीचे सर्व खासगी मालकीचे आहेत. पुणें म्युनिसिपल प्रेस, आनंदाश्रम, पुणें युनिव्हर्सिटी प्रेस हे त्या त्या संस्थांच्या छापकामाकरतांच केवळ उपयोगांत आणले जात असून ते धंद्यांतील प्रतिस्पर्धी नाहींत."

व्यावसायिक आत्मनिरीक्षण, मुद्रणप्रकाश, १०० वा अंक.


# NOTICE

**THE PRESIDENCY INDUSTRIAL BANK, Ltd., POONA.**

Notice is hereby given that the Fifteenth Ordinary General Meeting of the Share-holders of the Presidency Industrial Bank, Ltd., Poona, will be held on Sunday the 2nd March 1952, at the "Commonwealth Building," at 4 P. M. to transact the following business :—

1. To receive and consider the Profit and Loss Account, the Balance Sheet and the Report of the Directors and Auditors for the year ending 31st December 1951.

*2. To declare a Dividend.

3. To elect the Directors in place of the retiring Directors, who being eligible offer themselves for re-election.

4. To appoint Auditor or Auditors and to fix his or their remuneration.

5. To confirm the contribution of Rs. 625/- to Sardar Vallabhbhai Patel National Memorial Fund.

6. To transact any other business as may be allowed by the Chairman.

By order,

Poona City, 4th February 1952. } C. T. Chitale, Managing Director.

* The transfer Books of the Bank will be closed from 25th February to 8th March 1952.

# अर्थ

बुधवार, ता. १३ फेब्रुवारी, १९५२





संस्थापक :
प्रो. वामन गोविंद काळे

संपादक :
श्रीपाद वामन काळे


## इंपीरिअल केमिकल इंडस्ट्रीज लि. चें ज्युबिली वर्ष

### संशोधनास दिलेलें महत्त्व

इंपिरिअल केमिकल इंडस्ट्रीज लि. ह्या सुप्रसिद्ध ब्रिटिश कंपनीच्या स्थापनेस गेल्या महिन्यांत २५ वर्षे पुरी झालीं. १९१४–१८ च्या महायुद्धानंतर दारूगोळा करणाऱ्या कंपन्यांना मंदी सोसावी लागली व उत्पादन कमी करावें लागलें. रसायनें तयार करणाऱ्या कित्येक कंपन्यांचें एकत्रीकरण झालें आणि त्यांतूनच इंपीरिअल केमिकल इंडस्ट्रीज लि. चा ७ डिसेंबर, १९२६ रोजीं जन्म झाला. ह्याच सुमारास जर्मनी, अमेरिका, फ्रान्स व इटली ह्या देशांतून प्रतिस्पर्धी कंपन्यांचे व्यवहार वाढू लागले होते. इंपिरिअल केमिकल कंपनीनें स्पर्धेस तोंड देण्याचें, उत्पादन वाढविण्याचें व निर्गत व्यापार सुधारण्याचें धोरण आखलें. कंपनीचें आर्थिक सामर्थ्य जबर असल्यानें ज्या संशोधनाचा फायदा कालांतरानें मिळणार आहे, असें संशोधनहि ती हातीं घेऊं शकली. कोळशापासून पेट्रोल काढण्याच्या संशोधनावरच १९३१ अखेर तिनें दीड कोटी रुपये खर्च केले होते. १९३४ सालीं ब्रिटिश सरकारनें देशांतच तयार होणाऱ्या जळणास प्रोत्साहन देण्याचें धोरण जाहीर केलें, तेव्हां कंपनीची तें हातीं घेण्याची सर्व तयारी झालेलीच होती व १८ महिन्यांत मोठ्या प्रमाणावर उत्पादन सुरू होऊं शकलें. मंदीच्या काळांतहि कंपनीनें संशोधनावरील खर्च चालू ठेवला तो खऱ्या अर्थानें उत्पादक ठरला. १९३३ सालीं पॉलिथिनचा शोध त्यामुळेंच लागणें शक्य झालें.

इंपीरिअल केमिकल इंडस्ट्रीजचें १९५२ हें ज्युबिली वर्ष आहे. तिचें विक्रीस काढलेलें भांडवल सुमारें १३० कोटी पौंड आहे. तिचें १०० वर प्रचंड कारखाने सबंध ग्रेट ब्रिटनभर पसरलेले आहेत, आणि त्यांत १,००,००० कामगार स्त्री–पुरुष काम करीत आहेत. त्या कारखान्यांतून १२,००० वेगवेगळे जिन्नस तयार होतात. १९५० सालीं कंपनीच्या मालाच्या विक्रीची किंमत ३३० कोटी रुपयांपेक्षा अधिक भरली. कंपनीच्या मालाची निर्गत वाढत्या प्रमाणावर आहे. संशोधन व वाढ ह्यासाठीं कंपनी आतां दरसाल ८ ते ९ कोटी रुपये खर्च करीत असते. रसायनें, खतें, रंग, दारूगोळा, औषधें, अल्कली पदार्थ, प्लॅस्टिक्स, क्षार, इत्यादि अनेक प्रकारच्या जिनसांचें उत्पादन कंपनी करते.

नवीन जिनसांची माहिती करून देण्यासाठीं संशोधन आवश्यक असतें. त्या जिनसांचें उत्पादन कार्यक्षमतेनें घडवून आणण्यासहि संशोधनाचा मोठा उपयोग होतो, आणि त्या जिनसांचा सर्वांत चांगला उपयोग कसा होईल, हें ठरविण्यासाठींहि संशोधनाची जरूरी असते. इंपीरिअल केमिकल इंडस्ट्रीज लि. संशोधनाकडे पहिल्यापासूनच पद्धतशीर लक्ष पुरवीत आहे. त्या कंपनीकडे २,३५० रसायन शास्त्रज्ञ व १४०० इंजिनिअर्स कामावर आहेत, हा एकच गोष्ट वरील विधानाची सत्यता सिद्ध करण्यास पुरेशी आहे. संशोधनाची विभागणी स्थूल मानानें खालील पांच प्रकारांत करतां येते :—

( १ ) निसर्गाच्या मूलभूत नियमांविषयीं संशोधन, ( २ ) ह्या ज्ञानाचा चालू पद्धति सुधारण्याकडे उपयोग, ( ३ ) चालू जिनसांच्या उत्पादनासाठीं अगदीं नव्या व सुधारलेल्या पद्धतींचा शोध, ( ४ ) कारखानदारीस उपयुक्त अशा नव्या जिनसांचा शोध व ते तयार करण्याचें यशस्वी मार्गाचें दिग्दर्शन, आणि ( ५ ) इं. के. इंडस्ट्रीज तयार करीत असलेल्या मालाच्या योग्य वापराबाबत गिऱ्हाइकांना सहाय्य व्हावें, ह्यासाठीं संशोधन. शास्त्रीय संशोधनाचा मुख्य कार्यक्रम आणि विक्री विभागांतील सुधारलेल्या पद्धती, ह्यांस संशोधनाचा हा पांचवा प्रकार दुव्याप्रमाणें जोडणारा असतो. इंपीरिअल केमिकल इंडस्ट्रीज लि. च्या नेहमींच्या प्रयोग शाळांतून मूलग्राही संशोधन चालू राहिलें, तरी दैनंदिन अडचणी सोडविण्यासाठीं जें संशोधन करावें लागतें, त्याचा मूलग्राही संशोधनास व्यत्यय येतो. म्हणून, कंपनीनें वेल्विन येथें स्वतंत्र अशा बटरविल रिसर्च लॅबोरेटरीजची तात्त्विक संशोधनासाठीं मुद्दाम उभारणी केली आहे.

संशोधनाचा प्रत्यक्ष व्यापारी दृष्टया उपयोग घडवून आणण्याचें काम फार महत्त्वाचें असतें. डेव्हलपमेंट डायरेक्टर व त्याचे हाताखालीं दोन डेव्हलपमेंट कंट्रोलर्स ह्यांची कंपनीनें योजना केलेली असून त्यांच्या खात्यांकरवीं संकलित केलेल्या अनुभवाचा प्रत्यक्ष उपयोग केला जातो किंवा नाहीं, ह्याकडे काळजीपूर्वक लक्ष दिलें जातें. कंपनीच्या कोणत्याहि कार्यक्षेत्राकडे दुर्लक्ष होऊं दिलें जात नाहीं. प्रत्येक धंद्यास अत्यावश्यक असलेलें साहित्य व सहाय्य वेळचेवेळीं मिळालें पाहिजे, असा आग्रह धरला जातो. लायक व वाकबगार असेच शास्त्रज्ञ व इंजिनिअर्स नेमण्यामुळें होणाऱ्या फायद्याची कंपनी नेहेमीं जाणीव ठेवते. इतर देशांचे मानानें ग्रेट ब्रिटनमध्यें संशोधनाचें प्रत्यक्ष कृतींत रूपांतर होण्यास वेळ लागत असे; जर्मनी, स्वित्झर्लंड व अमेरिका ह्याबाबतींत अधिक तत्पर असत. इंपीरिअल के. कंपनीनें हा दोष नष्ट करण्याचा कसून प्रयत्न चालविला आहे. विद्यापीठें व इतर संस्था ह्यांना संशोधनासाठीं कंपनी मुक्त हस्तानें कितीतरी प्रकारची आर्थिक मदत करते. रसायनें व प्रयोगाचीं साधनेंहि मोफत पुरविते. संशोधन कशाचें करावें, ह्या बाबत कंपनी आग्रह धरीत नाहीं. ह्या मदतीचा फायदा मिळणाऱ्या शास्त्रज्ञांची संख्या सुमारें ८०० आहे.

रासायनिक धंदा हा अत्यंत बिकट स्वरूपाचा असून त्याचें शास्त्र एकसारखें बदलत व सुधारत जात आहे. तथापि, इंपीरिअल केमिकल इंडस्ट्रीज लि. मोठ्या प्रमाणावर प्रयत्न करून ब्रिटिश रासायनिक धंदा भरभराटींत ठेवीत आहे. व्याप वाढला म्हणजे त्याबरोबर कांहीं दोषहि निर्माण होतात, तथापि अशाच प्रकारच्या इतर संघटनांशीं इं. के. इंडस्ट्रीजची तुलना नीटपणें अद्याप झालेली नाहीं.

## सहावे जॉर्ज यांचें निधन

सहावे जॉर्ज ६ फेब्रुवारी रोजीं मृत्यु पावले व त्यांचे जागीं एलिझाबेथ ही राणी गादीवर आली. दुसऱ्या महायुद्धाचे अत्यंत बिकट परिस्थितींत सहावे जॉर्ज व राजघराण्यांतील मंडळी ह्यांनीं अत्यंत विभेपणानें आपलीं कर्तव्यें पार पाडीत रहाण्याचा धडा स्वतःच्या आदर्श उदाहरणानें घालून दिला, त्यामुळें सामान्य जनतेंतहि निर्धारयुक्त आत्मविश्वास निर्माण होऊन संकटांतून तें राष्ट्र बाहेर पडूं शकलें, ही सहावे जॉर्ज ह्यांची इंग्रज जनतेची फार मोठी सेवा झाली. सध्यांचा काळ राजेलोकांना अनुकूल नसतांनाहि, इंग्लंडमध्यें मात्र राजघराण्याची लोकप्रियता वाढावी, अशी कामगिरी सहावे जॉर्ज ह्यांची व त्यांच्या कुटुंबीयांची झाली आहे. प्रिन्सेस एलिझाबेथनेंहि आपल्या वडिलांच्या मृत्यूचें दुःख गिळून, आपल्या नव्या कर्तव्यपालनास लागलींच प्रारंभ केला आहे, ही गोष्ट वृत्तपत्रें वाचणारांच्या लक्षांतून सुटली नसेल. वडिलांच्या मृत्यूची वार्ता समजतांच, नव्या राणीनें ४,००० मैलांचा विमानाचा प्रवास करून लंडन येथें उतरतांच विमान चालविणाऱ्या आठहि जणांशीं स्मित मुखानें हस्तांदोलन केलें, ही गोष्ट काय दर्शविते? नैरोबीहून विमानांतून निघतानाहि अशींच धीरोदात्त समयोचित मुद्रा तिनें धारण करून निरोप घेतला होता. इंग्लंडमध्यें आल्यावर एक-दोन तासांतच पुढील व्यवस्थेसाठीं तिनें मुख्य प्रधानांशीं चर्चा करून सूचना दिल्या.

बकिंगहॅम राजवाड्यावर बॉंबवृष्टि झाली, त्यावेळीं सहावे जॉर्ज व राणी हे दोघेहि राजवाड्यांत होते, आणि त्यावेळीं त्यांचा थोडक्यांत बचाव झाला, ह्या गोष्टीचा मुख्य प्रधान व सहावे जॉर्ज ह्यांची नेहमीं भेट होत असे तरीसुद्धां त्यांनीं उल्लेख केला नाहीं. रणांगणांतील सैनिकांसमोर दारूगोळ्याचा स्फोट होणें जसें मामुली समजलें जातें, तसेंच सहाव्या जॉर्जनीं आपल्या दैवी बचावास मानलें, इतके ते जनतेशीं एकरूप झाले होते.

इंग्रजांच्या ह्या वैशिष्ट्यपूर्ण वागणुकीचें रहस्य भारतीयांनीं समजून घेऊन त्याचें अनुकरण करण्याजोगें आहे. कोणत्याहि परिस्थितींत कर्तव्यास अग्रस्थान देण्याचा निर्धार प्रत्येकानें केला, तर त्याचा एकत्रित परिणाम देशहितास पोषक झाल्याविना रहाणार नाहीं. आदर्श वागणुकीमुळेंच राजा काय, किंवा पुढारी काय, आपल्या स्थानाबद्दल आदर वृद्धिंगत करूं शकतो व सामान्य लोकांचीहि पातळी वाढवूं शकतो.

### दफनविधीसाठीं सहा मुकुटधारी हजर

सहाव्या जॉर्जच्या दफनविधीस युरोपांतील पांच राजे व एक राणी असे सर्वच्या सर्व मुकुटधारी उपस्थित रहातील. पांचव्या जॉर्जच्या दफनविधीस असे पांचजण हजर होते. म्हणजे, १९३६ नंतर मुकुटधारी राजांची संख्या कमी झाली असूनहि, दफनविधीस त्यांची उपस्थिति वाढणार आहे.

### बँक-अधिकारी लंडनकडे रवाना

कॅनरा बँक लि. चे मुंबई विभागाचे मॅनेजर श्री. सी. एकनाथ कामत हे रविवारीं सकाळीं लंडनला रवाना झाले. बँकिंगच्या कारभाराचा अभ्यास करण्यासाठीं ते गेले आहेत.

### बावचीं ग्रामपंचायतचे सरपंच

ग्रामपंचायत, बावचीचे सरपंच श्री. पांडुरंग नाना यादव हे आहेत, असें "अर्था"च्या गेल्या अंकांत लिहिलें होतें. त्या ठिकाणीं श्री. विष्णु महादेव यादव असें नांव पाहिजे.

## "मिस इंडिया" ची निवड

### स्पर्धेबाबत तपशील

मुंबई, मद्रास, कलकत्ता, दिल्ली, बंगलोर आणि लखनौ येथील चढाओढींतून यशस्वी होणाऱ्या उमेदवारांतून "मिस इंडिया" ची निवड मुंबई येथें ब्रेबर्न स्टेडियममध्यें एप्रिल, १९५२ मध्ये होईल. प्रत्येक देशांतून निवडून आलेल्या सुंदर मुलींतून कॅलिफोर्नियांत लॉंग बीच येथें "मिस युनिव्हर्स" ची निवड होईल. उमेदवारांचें वय २२ जून, १९५२ रोजीं १८ ते २८ वर्षे असले पाहिजे. सौंदर्याच्या स्पर्धेच्या वेळीं बँड, मिरवणुकी, इत्यादींतून जमा होणारें उत्पन्न सोसायटी फॉर दि रीहॅबिलिटेशन ऑफ क्रिपल्ड चिल्ड्रेनला देण्यांत येईल. सौंदर्याबरोबरच सौष्ठव, व्यक्तिमत्व, चलाखी, मोहकपणा, इत्यादींस महत्त्व दिलें जाईल. "मिस इंडिया" परदेशीं प्रवास करील, तेव्हां तिचा मानसन्मान होईलच परंतु त्याबरोबर भारताच्या तरूण पिढीचें सुस्वरूपहि जगास पहावयास मिळणार आहे. त्याकरितां, "मिस इंडिया" निवडतांना चांगल्या घराण्यांतील तरुणीस अग्रस्थान मिळणें क्रमप्राप्त आहे. तिचें शिक्षणहि चांगलें झालेलें असणें अगत्याचें आहे कारण, इतर देशांतील लोकांवर, विशेषतः वृत्तपत्रांच्या प्रतिनिधींवर ती छाप पाडूं शकली पाहिजे. ह्यावरच भारताविषयी अनुकूल मत निर्माण होणें अवलंबून आहे. जगाच्या सर्व कानाकोपऱ्यांतून भारताबद्दल आपुलकी निर्माण करूं शकेल, अशी 'मिस इंडिया' निवडण्याचा प्रयत्न केला जाईल. मेसर्स ई. एस. पाटणवाला ही फर्म 'मिस इंडिया'चा लॉंग बीच (कॅलिफोर्निया) ला जाण्यायेण्याचा खर्च सोसील. गोल्ड फिल्ड लेदर वर्क्स तिला प्रवासाचें साहित्य पुरवील. असोसिएटेड वॉच कंपनी तिला ४,००० रु. चें घड्याळ देईल. दि इंडिया ट्रेड अँड जनरल इन्शुअरन्स कं. तिचा ५,००,००० रु. चा प्रवासांतील धोक्याचा विमा पत्करील. डेक्कन एअरवेज अंतिम निवडीसाठीं जाणारांना भारतांत आपल्या विमानांतून फुकट नेईल व आणील. 'मिस इंडिया' ही 'मिस युनिव्हर्स' झाल्यास तिला युनिव्हर्सल पिक्चर्सकडून वार्षिक ५,००० डॉलर्सचें सिनेमा-कॉन्ट्रॅक्ट किमान सहा महिने मुदतीचें मिळेल. अखेरच्या चार उमेदवारांना कमी मुदतीचीं कॉन्ट्रॅक्टस् मिळतील. सौंदर्य स्पर्धा समितीच्या अध्यक्ष लेडी रामराव, रिझर्व्ह बँकेचे गव्हर्नर सर बेनिगल रामराव ह्यांच्या पत्नी, ह्या आहेत.

### प्रो. जे. बी. टेलर

दुसऱ्या महायुद्धाचे वेळीं चीनमध्यें सुप्रसिद्ध "इंडस्को" चळवळ प्रभावी करण्यास मदत करणारे प्रो. जे. बी. टेलर हे निवर्तल्याची बातमी को. न्यूज बुलेटिननें उद्धृत केली आहे. १९४४ मध्ये ते हिंदुस्थानांत आले व मुंबईत एक महिना राहून मुं. प्रां. इं. को. असोसिएशनला बहुमोल सल्ला दिला. बॉंबे को. कार्टर्लींत त्यांनीं बरेच लेख लिहिले. "इंडस्ट्रिअल कोऑपरेशन" हें त्यांचें पुस्तक हिंदी सहकारी चळवळीस परिचयाचें आहेच.

### अमेरिकेजवळील ॲटॉमिक बॉंब

नागासाकी येथें उपयोगांत आणलेल्या ॲटॉमिक बॉंबच्या प्रकारचे निदान १,००० बॉंब अमेरिकेजवळ आहेत, असें एका अमेरिकन ॲटॉमिक शास्त्रज्ञानें नुकतेंच सांगितलें. रशियाजवळ १०० पेक्षां कमीच ॲटॉमिक बॉंब असावेत, असेंहि त्यांचें मत आहे.

## उत्तर–प्रदेश सरकारचा ग्रामोद्धाराचा कार्यक्रम

भारताच्या पंचवार्षिक कार्यक्रमांत शेतीसुधारणेला प्रमुख स्थान देण्यांत आलें आहे. शेतीसुधारणेबरोबर ग्रामीण जीवनाच्या विविध अंगांचा विकास होणेंहि अगत्याचें आहे. ह्या कामीं उत्तर प्रदेश सरकारनें उपयुक्त कार्यास प्रारंभ केला आहे. एकसूत्री योजना आणि मनुष्यबळ ह्यांच्या संयोगानें खेड्यांतील जीवनाची सुधारणा कशी करतां येते तें उत्तर–प्रदेश सरकारच्या प्रयत्नावरून दिसून येते.

सरकारकडे निरनिराळया जिल्ह्यांच्या प्रगतीचे अहवाल आलेले आहेत. ग्रामोद्धाराची योजना हातीं घेतल्याला आतां जवळ जवळ सहा महिने झाले. तेवढ्या काळांत १४,६४२ कच्च्या घरांचे पक्क्या घरांत रूपांतर करण्यांत आलें. १,३९७ छोट्यामोठ्या रस्त्यांची दुरुस्ती करण्यांत आली; कांहीं नवीनही बांधण्यांत आले. खेडेगांवांच्या मधील दळणवळणाला ह्या रस्त्यांनीं चांगलीच मदत होणार आहे. त्याशिवाय ५४८ पंचायत घरें बांधण्यांत आलीं आणि ३,७४५ फळांच्या बागा लावण्यांत आल्या. ही सर्व कामें करण्यांत गांवकऱ्यांनीं सहकार्य केलेलें होतें. शेतीच्या उत्पन्नांत वाढ होईल, अशा प्रकारच्या कामाकडे अधिक लक्ष देण्यास गांवकऱ्यांना सुचविण्यांत आलें होतें. त्याप्रमाणें सुमारें ६,२४९ एकर पाणथळ जमीन लागवडीला योग्य करण्यांत आली. ९८९ विहिरी अधिक खोल करण्यांत आल्या; १,७५१ तालीं बांधण्यांत आल्या. ५,२५४ नव्या विहिरी बांधण्यांत आल्या आणि २,३२७ जुन्या विहिरी दुरुस्त करण्यांत आल्या. ट्यूब विहिरी १,०९८ खोदण्यांत आल्या. ह्या उपयुक्त कामामुळें सुमारें ५२,५६४ एकर पडीक जमीन लागवडीला आणण्यांत आली आहे. खतें तयार करण्याचे २,७८,२८२ खड्डे खणण्यांत आले आणि गुरांच्या मूत्राचें खत तयार करण्यासाठींहि खड्डे तयार करण्यांत आले.

गांवागावांचे गट पाडून प्रौढांना साक्षर करण्याचा कार्यक्रम आखण्यांत आला होता. त्याप्रमाणें ३० जिल्ह्यांतील २९,८३३ प्रौढांना साक्षर करण्यांत आलें. तथापि सामाजिक शिक्षणाचा हेतू फक्त प्रौढांना साक्षर करणें एवढाच ठेवण्यांत आलेला नाहीं. त्यापेक्षा अधिक उच्च ज्ञान देण्याचे प्रयत्नहि करण्यांत येत आहेत. ३२ जिल्ह्यांतील गांवकऱ्यांनीं मिळून २,६८३ वाचनालयें काढलीं आणि ३० जिल्ह्यांनीं आपल्या हद्दींत खेळण्याचीं मैदानें बनविलीं अगर आखाड्यांची स्थापना केली. गांवांतील सांडपाण्याचा निचरा करण्यासाठीं १३ जिल्ह्यांनीं १३,६३० कच्च्या मोऱ्या बांधल्या आणि चर खणून संडासांची व्यवस्था केली. अशा प्रकारचे २,१३२ संडास बनविण्यांत आले. गांवांचे जे गट पाडण्यांत आले होते त्या प्रत्येक गटांतून निदान ५ विहिरी तरी पिण्याच्या पाण्यासाठीं योग्य तऱ्हेनें दुरुस्त करण्यांत याव्या असें सुचविण्यांत आलें होतें. त्याप्रमाणें १२ जिल्ह्यांनीं ३,१४२ विहिरी पिण्याच्या पाण्यासाठी म्हणून नव्यान बांधल्या. त्याशिवाय ४,५८१ विहिरींची ह्या दृष्टीनें दुरुस्ती करण्यांत आली. उत्तर प्रदेश सरकारनें जो पंचवार्षिक कार्यक्रम आखला आहे त्यांत शेळ्यांच्या उत्तम जाती पैदास करण्याचा अंतर्भाव करण्यांत आला आहे. गांवसभांचा कारभार नीट चालण्यासाठी त्यांच्या करांची वसुली वेळच्यावेळीं होणें जरूर आहे, ही गोष्ट लक्षांत घेऊन बऱ्याच जिल्ह्यांतील गांवसभांनीं कर वसूल करण्यासाठी जोराचे प्रयत्न सुरू केले आहेत.

### जागतिक बँकेचा नवा सभासद

इंटरनॅशनल बँकेचीं आणि मॉनेटरी फंडाचीं जीं सभासद राष्ट्रें आहेत, त्यांत लवकरच आणखी एका राष्ट्राची भर पडण्याचा संभव आहे. हें राष्ट्र म्हणजे प. जर्मनी होय. प. जर्मनीचें व्यापार खातें आणि बँक व फंडाचे अधिकारी ह्यांच्या दरम्यान ह्याविषयीं नुकत्याच वाटाघाटी करण्यांत आल्या. प. जर्मनीला कोणत्या अटीवर सभासद करून घ्यावें, ह्यासंबंधीं फंडाच्या डॉयरेक्टर बोर्डाच्या मेंबरशिप कमिटीची सभा अखेरचा निर्णय घेण्यासाठी भरली होती. जर्मनीला सभासद करून घेतांना काय अटी घालण्यांत येतील, तें अद्याप अधिकृत रीत्या जाहीर झालेलें नाहीं. तथापि त्यासंबंधीं अंदाज करण्यांत येत आहे. जर्मनीला सुमारें ३५ कोटी डॉलर्सची वर्गणी द्यावी लागेल असें वाटतें. एवढी वर्गणी घेण्यांत आली तर वर्गणीच्या दृष्टीनें जर्मनीचा अनुक्रम सहावा लागेल. कानडा व हॉलंड ह्यांचाहि अनुक्रम सहावाच लागतो. कोणता देश किती वर्गणी देतो ह्यावर बोर्ड ऑफ डायरेक्टर्सवरील त्याची मतदानाची पात्रता ठरविण्यांत येते. त्याचप्रमाणें बँकेकडून कर्जाऊ मिळूं शकणाऱ्या रकमेची मर्यादाहि वर्गणीप्रमाणें ठरविण्यांत येत असते. अमेरिकेची वर्गणी सर्वांत जास्त म्हणजे २७० कोटी डॉलर्स आहे. त्यानंतर ब्रिटनचा नंबर लागतो. ब्रिटनची वर्गणी १३० कोटी डॉलर्स आहे. त्यानंतर चीन, फ्रान्स व भारत असा अनुक्रम लागतो. प. जर्मनीला अटलांटिक संरक्षण करारांत भागीदार करून घेण्याचे प्रयत्न चालू आहेत. ते यशस्वी झाले तर जर्मनीला शस्त्रास्त्रें वाढवावीं लागतील आणि डॉलर्स मिळविण्याकरितां निर्यातहि करावी लागेल. ह्या दोन प्रकारच्या भाराखालीं ब्रिटन व फ्रान्स मेटाकुटीला आलीं आहेत. जर्मनी कितपत तग धरूं शकतो, तें काळच दाखवूं शकेल.


**१९५० अखेरचें ११ वें यशस्वी मूल्यमापन**

**१९५० मध्येंही रु. २६५ लाखांवर नवीन विम्याचें पूर्ण काम.**

# वे स्ट र्न इं डि या

**विमा कंपनीनें**

**आपलें सामर्थ्य, स्थैर्य व सेवा**

यासंबंधीची प्रचिती पुन्हां एकवार विमा जगतास आणून दिली आहे.

**दर हजारी त्रैवार्षिक बोनस**

| हयातींतील पॉलिसी | हयातीनंतरची पॉलिसी |
|---|---|
| रु. २७ | रु. ३३ |

कंपनीच्या वाढत्या वैभवांत सहभागी व्हा व सर्वोत्कृष्ट फायद्यासाठीं

**वेस्टर्न इंडियाची निवड करा.**

के. वाय. जोशी, बी. ए., एफ. आय. ए.

मॅनेजर

# वेस्टर्न इंडिया लाईफ इन्शुअरन्स कंपनी लि. सातारा.

शाखा कचेरीः— शहर: १७९ बुधवार पेठ, लक्ष्मीरोड, पुणें. फोन नंबर— ३४०२

कँप: केअर–ऑफ केसरेल्स ईस्ट स्ट्रीट, पुणें-१

### दि फलटण शुगर वर्क्स लि.

वरील कंपनीनें ३० सप्टेंबर, १९५१ अखेर संपलेल्या वर्षी ८९ लक्ष, ३० हजार रुपयांची साखर विकली. कंपनीच्या ऑइल मिलच्या तेल विक्रीचे २१ लक्ष, २३ हजार रुपये मिळाले. एकूण उत्पन्न ९४ लक्ष, ५३ हजार रु झालें. पिकाचा खर्च, केनसेस, स्टोर्स, केमिकल्स, एक्साइज ड्यूटी, मॅ. एजंटांचें कामिशन, घसारा, गाळलेला भुइमूग, इत्यादींचा खर्च वजा जाऊन १५ लक्ष, ८३ हजार रु निव्वळ नफा ताळेबंदाकडे नेण्यांत आला. ८% डिव्हिडंडला ८ लक्ष रु. लागले, करासाठी १ लक्ष रु. बाजूस काढण्यांत आले व ५ लक्ष रु. रिझर्व्ह फंडाकडे वर्ग करण्यांत आले. ४३९० एकरांत ऊस लावलेला होता. पीक समाधानकारक आलें. उसाच्या नव्यां जातींचे व खतांचे प्रयोग चालू होते. पश्चिम जर्मन लागवडीखालीं आणण्यासाठी यंत्रांचा वाढता उपयोग करण्यांत येत आहे. साखरेचा उतारा चांगला पडला व साखरेचा दर्जाहि चांगला होता. अहवालाचे वर्षी इलेक्ट्रिक बायलॉजप्रमाणें विजेचा करंट डी. सी. चा ए. सी. करण्यांत आला. कंपनीनें १९,४८९ रुपयांच्या देणग्या विविध संस्थांना दिल्या. कंपनीचें वसूल भांडवल ५० लक्ष रुपये असून रिझर्व्ह फंड २९,३५,००० रु. आहे. प्रॉव्हिजन रिझर्व्ह फॉर स्टाफ क्वॉर्टर्समध्यें ५ लक्ष रु. आहेत. कंपनीनें इमारती, यंत्रसामुग्री, इत्यादींवरील घसारा काढून त्यांची किंमत कमीकमी करीत दाखविण्याचें धोरण अंगिकारलें आहे. त्यामुळें, मूळ ८५३ लक्ष रुपयांची मालमत्ता ताळेबंदांत फक्त ४२३ लक्ष रु. च दिसत आहे. एकूण ताळेबंद १,३२,९७,११२ रुपयांचा आहे. मेसर्स मफतलाल, आपटे अँड कांतिलाल लि. कडे कंपनीची मॅनेजिंग एजन्सी असून तिचे वतीनें तिचे मॅनेजिंग डायरेक्टर श्री. वामन श्रीधर आपटे हे व्यवस्था पहात आहेत.

---

### चांदवड सेक्रेटरी ट्रे० क्लासचा समारोप

चांदवड सेक्रेटरी ट्रेनिंग क्लासचा समारोप मे. जॉइंट रजिस्ट्रार को-ऑपरेटिव्ह सोसायटीज, पुणें, श्री. प्रभूसाहेब यांचे हस्तें तारीख २८-१-१९५२ रोजीं करण्यांत आला. त्यावेळीं मे. असि. रजिस्ट्रारसाहेब श्री. पाटील, मे. डिस्ट्रिक्ट को. ऑफिसर, नाशिक, मे. असि. डि. को. ऑफिसर, नाशिक, को. ट्रेनिंग इन्स्पेक्टर आणि सुपरवायझर तसेंच श्री. कापडिया व ४० विद्यार्थी समारोपास हजर होते. समारोपाचें प्रास्ताविक भाषण श्री. एन्. वाय. कुलकर्णी यांनीं केल्यावर श्री. प्रभूसाहेब, अध्यक्ष, यांनीं सहकारी शिक्षणाचें महत्त्व समजावून देऊन, सेक्रेटरी हा सहकारी चळवळीचा एक महत्त्वाचा घटक आहे व त्याचेवर सहकारी सोसायटीचें भवितव्य सर्वस्वी अवलंबून असतें यावर उत्कृष्ट भाषण केलें. नंतर आभारप्रदर्शन होऊन हा समारंभ संपल्याचें जाहीर करण्यांत आलें.

---

### प्रेसिडेन्सी इंडस्ट्रिअल बँक लि.

अहवालाचे वर्षी वरील बँकेस ७०,३४६ रु. नफा झाला. त्यांत मागील वर्षांतील शिल्लक नफा २९८ रु. मिळविला म्हणजे नफावाटणीस ७०,६४४ रु. येतात. रिझर्व्ह फंडांत २३,२०० रु. टाकावे, २५,२०७ रु. चा ३½% करमाफ डिव्हिडंडसाठी विनियोग करावा, १६,००० रु. चीं कराची तरतूद करावी व ५,५०० रु. रिझर्व्ह फॉर इनव्हेस्टमेंटमध्यें घालावे अशी डायरेक्टरांची शिफारस आहे. १९५० चे मानानें १९५१ मध्यें बँकेनें सर्व दिशेनें प्रगति केली आहे. [चेअरमन : ग. रा. साठे. मॅ. डायरेक्टर : चिं. त्रिं. चितळे. मॅनेजर : जी. डी. जोगळेकर, बी. ए. (ऑ.) बी. कॉम., एलएल. बी.]


## पुणें सेंट्रल को-ऑपरेटिव्ह बँक लि.

— पुणें शहर —

लक्ष्मी रोड

पोस्ट बॉक्स नं. ५११ ] [ टेलिफोन नं. २४८३

भोर, पौड व वडगांव (मावळ) येथें बँकेनें आपल्या नवीन शाखा-कचेऱ्या उघडल्या आहेत. येथें व इतर शाखांतही सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार व सहकारी सोसायट्यांना शेतीसाठीं कर्जें देणें, सोनें-चांदीचे तारणावर कर्जें देणें, वगैरे व्यवहार सुरू केले आहेत.

**चालू, सेव्हिंग्ज ठेवी स्वीकारल्या जातात.**

**अेक ते दहा वर्षें मुदतीच्या ठेवीही स्वीकारल्या जातात.**

१ वर्ष २ टक्के, २ वर्षें २॥ टक्के, ५ वर्षें ३ टक्के, ७ वर्षें ३॥ टक्के, १० वर्षें ४ टक्के. याशिवाय रुपये २५,००० अगर पुढील रकमा ३ ते ९ महिने मुदतीनें घेण्यांत येतात.

**दराबद्दल समक्ष चौकशी करावी.**

वरीलप्रमाणें सर्व व्यवहार पुणें येथें मुख्य कचेरींत व इतर शाखांमध्यें होत असून त्याशिवाय पुणें येथें सेफ डिपॉझिट व्हॉल्टस व सेफ कस्टडीची सोय आहे. त्याचा फायदा खातेदारांनीं घ्यावा.

जास्त माहितीसाठीं लिहा अगर समक्ष भेटा.

मो. वि. रवडे,
मॅनेजिंग डायरेक्टर.

## दि बॉम्बे प्रॉव्हिन्शिअल को-ऑपरेटिव्ह बँक लिमिटेड

९ बेक हाऊस लेन, कोट, मुंबई,
स्थापन साल १९११

चेअरमनः-श्री. आर. जी. सरैय्या, ओ. बी. ई.

| | |
|---|---|
| मागांचें भांडवल | रु. ४८,२६,००० |
| गंगाजळी फंड | रु. ३३,४१,००० |
| ठेवी | रु. ८,६९,९७,००० |
| खेळतें भांडवल | रु. १०,४३,९३,००० |

### १५ जिल्ह्यांत ६५ शाखा

भारतांतील प्रमुख शहरीं हुंड्या, बिलें वगैरे वसुलीची व्यवस्था आहे. सर्व प्रकारच्या ठेवी स्वीकारल्या जातात. शर्तींबद्दल चौकशी करावी.

व्ही. पी. वर्दे
ऑ. मॅनेजिंग डायरेक्टर.

## ५०,००० रुपयांखालील भांडवल–रिझर्व्हज्च्या बँका

बँकिंग कंपन्यांच्या कायद्यानें, प्रत्येक बँकेस वसूल भाग भांडवल व रिझर्व्हज् मिळून किमान ५० हजार रुपयांची रक्कम आवश्यक ठरविली आहे. कित्येक लहान बँकांचें भांडवल व रिझर्व्हज् ह्यापेक्षा पुष्कळच कमी असल्यानें, त्यांना ह्या मर्यादेपर्यंत येण्यास तीन वर्षांची मुदत देण्यांत आली होती. ही मुदत ३१ मार्च, १९५२ अखेर संपत आहे. १९५० अखेरचे आकडे उपलब्ध आहेत, त्याप्रमाणें बारा महिन्यांपूर्वी ह्या मर्यादेचे खाली १५० बँकिंग कंपन्या होत्या. मुंबई राज्यांत अशा बँका फारच थोड्या आहेत; मुख्य प्रश्न मद्रास व प. बंगाल येथील लहान बँकांपुढील आहे. ह्या १५० पैकी निम्म्या बँका एकट्या मद्रास राज्यांत व ४९ बँका प. बंगालमध्यें होत्या. १९५१ मध्यें त्यांची संख्या थोडी कमी झाली असली पाहिजे. मार्च, १९५१ नंतर ५० हजार रुपयांखालील भांडवल–रिझर्व्हज्वाल्या बँकांचें काय होणार, असा प्रश्न आतां उपस्थित होणें स्वाभाविक आहे. भारतांत आणखी बँकिंगच्या सोई आवश्यक असतांना, अस्तित्वांत असलेल्या लहान बँकांवर बंद होण्याचा किंवा विलीन होण्याची आपत्ति येऊं पहात आहे. वाढत्या खर्चाच्या व उतरत्या ठेवींच्या सध्याच्या काळांत कित्येक लहान बँकांना टिकाव धरून रहाणें कठीण होणार आहे. बँकिंग कंपन्यांच्या कायद्यांतील दुरुस्तीनें विलिनीकरणाचा मार्ग थोडा सुकर केला असला, तरी त्यांत अडचणी कांहीं कमी नाहींत. वैयक्तिक स्वार्थत्यागानें व श्रमानें उभ्या केलेल्या संस्थांचे चालक आपलें मानाचें किंवा प्रतिष्ठेचें स्थान सहजी सोडून देण्यास कसे तयार होणार? विलिनीकरण झाल्यानंतर मोकळ्या होणाऱ्या मॅ. डायरेक्टरांना व व्यवस्थापकांना जागा कोठें मिळणार? लहान बँकांकडे पहाण्याचा लोकांचा दृष्टिकोन वेगळा असतो; त्यांत वैयक्तिक नात्याचा संबंध मोठा असतो. बँकेचे खातेदार "अमक्या" च्या बँकेशीं व्यवहार करीत असतात; व्यक्तीपासून स्वतंत्र अस्तित्व निर्माण होण्याइतपत तिचा व्याप वाढलेला नसतो. हें सर्व खरें असलें, तरी परिस्थितीचें दडपण टाळतां येण्याजोगें नाहीं आणि लहान बँकांचें मोठ्या बँकांशीं किंवा त्यांचें एकमेकांशीं विलिनीकरण होणें अपरिहार्य होणार आहे. ह्या क्रियेंत भागीदारांच्या भागांची किंमत कमी धरावी लागण्याचा संभव आहे. परंतु, ताळेबंदांत दिसणाऱ्या किंमतीपेक्षा ती खरोखरच कमी ठरली, तर केवळ वस्तुस्थिति म्हणून ती स्वीकारण व्यवहारास धरूनच होईल.

---

### "हिंदी लोकांस चौकस बुद्धि नाहीं"

"हिंदी मासे आणि बेडूक लंडनला घेऊन कां चालला आहांत?" असें विचारलें असतां, सुप्रसिद्ध इंग्रज शास्त्रज्ञ प्रो. जे. बी. एस. हाल्डेन हे म्हणाले, "संशोधनासाठीं व गमतीसाठीं! तुम्हां हिंदी लोकांना कशाबद्दल कुतूहलच वाटत नाहीं आणि कोणत्याहि विषयाचे तज्ज्ञ होण्याची तुमची इच्छाच नाहीं." कलकत्ता येथील सायन्स काँग्रेसच्या अधिवेशनासाठीं प्रो. हाल्डेन भारतांत आले होते, ते ता. ३ रोजीं परत गेले.

---

**प्राणिसंग्रहालयासाठीं हत्ती**—लंडनमधील प्राणिसंग्रहालयासाठीं सयामकडून कांहीं हत्ती मागविण्यांत आले आहेत. हत्तींचा पहिला गट नुकताच विमानानें रवाना झाला. आतां आणखी पांच हत्ती रवाना करण्यांत येत आहेत. ही वाहतूक ब्रिटिश ओव्हरसीज कॉर्पोरेशन करीत आहे.

सारस्वत को-ऑपरेटिव्ह बँक, लि. (स्थापना १९१८)
शाखा :
१ दादर
२ माहीम
३ बेळगांव
४ पुणें—सोमवार पेठ, सारस्वत कॉलनी, पुणें.
ठेवी १ कोटीवर
हेड ऑफिस- गिरगांव, मुंबई.

---

**इराण-हंगेरी व्यापारी करार**—इराण व हंगेरी ह्या राष्ट्रांच्या दरम्यान तेल व इतर वस्तूंच्या व्यापारासंबंधीं एक करार झाला आहे. पूर्व-युरोपांतील राष्ट्राला तेल विकण्याचा इराणचा हा पहिलाच करार आहे.

**भारतीय सरकारचा भांडवली कार्यक्रम**—भारतीय सरकार १९५२–५३ सालीं सुमारें १८० कोटी रुपये भांडवली खर्च करणार आहे असें समजतें. त्याचा तपशील पुढीलप्रमाणें आहे. १४ कोटी रुपये नद्यांवरील बांधकामें, १५ कोटी रुपये रेल्वे, ८ कोटी रुपये पोस्ट व टेलिग्राफ, ५ कोटी रुपये मुलकी बांधकामें, ९ कोटी रुपये सरकारी मालकीचे कारखाने, २३ कोटी रुपये निर्वासितांची पुनर्घटना, आणि ८ कोटी रुपये अधिक धान्य पिकविण्याची मोहीम.

**संस्थानिकाची प्राध्यापकाला देणगी**—म्हैसूरचे महाराज कॉलेजमध्यें शिकत असतां प्रा. डिसूझा हे प्रोफेसर त्यांना शिकवीत असत. प्रा. डिसूझा ह्यांची बँक ट्रायब्यूनलवर नेमणूक झाल्यावर त्यांना म्हैसूर सोडून जावें लागलें. पण जाण्यापूर्वी महाराजांनीं त्यांना आपल्या भेटीला बोलवून एक पाकिट त्यांच्या स्वाधीन केलें व घरीं गेल्यावर तें उघडा म्हणून सांगितलें. प्रा. डिसूझा ह्यांनीं तें आज्ञेप्रमाणें फोडल्यावर आंत १०० रुपयांच्या २५० नोटा असल्याचें त्यांना कळून आलें.

**स्मृतीला उजळा देणारें औषध**—स्मृतिभ्रंशाच्या विकारावर भारतांत वापरण्यांत येणारें एक प्राचीन औषध कितपत प्रभावी आहे तें अजमावण्यासाठीं त्यांचा प्रयोग भ्रष्टस्मृति रोग्यांवर करण्यांत येणार आहे. ऑक्सफर्ड विद्यापीठाच्या औषधीय शाखेंत काम करणारे डॉ. कुसिम ह्यांनीं ह्या औषधाची माहिती मि. मॉरिस ह्या ब्रिटिश डॉक्टरांना दिली आहे. प्रयोगाचा निकाल ४ महिने तरी लागणार नाहीं.

**नान्गल विद्युत् केंद्रास प्राधान्य**— नान्गल येथें उभारण्यांत येणाऱ्या विद्युत्-केंद्रासाठीं लागणारी यंत्रसामुग्री अमेरिकेहून मागविण्यांत आली आहे. त्यापैकीं कांहीं साहित्य भारतांत आलें. परंतु अमेरिकेच्या शस्त्रास्त्र-वाढीच्या कार्यक्रमामुळें बाकीच्या साहित्याला विलंब लागू लागला. भारतांतील अमेरिकेचे वकील मि. बाल्स ह्यांना भारत सरकारनें ह्यासंबंधीं खटपट करण्याची विनंति केली होती. त्यांच्या खटपटीस यश येऊन उरलेली यंत्रसामुग्री ताबडतोब पाठविण्याची व्यवस्था झाली आहे.

**अमेरिकेंतील वृत्तपत्रांचा खप**- गेल्या वर्षी अमेरिकेंत दररोज ५·४ कोटी दैनिक वृत्तपत्रें खपत असत, असा अंदाज करण्यांत आला आहे.

**मोटार कामगारांत कंपात**—ब्रिटनमध्यें कॉव्हेंट्री येथें रूट्स मोटर कंपनीचा कारखाना आहे. ह्या कारखान्याला अलीकडे पोलादाचा तुटवडा भासूं लागला आहे. त्यामुळें कारखान्यांत काम करणारांपैकीं ८०० कामगारांना काढून टाकण्याचें चालकांनीं ठरविलें आहे. ब्रिटनमधील पोलादाच्या टंचाईचा हा परिणाम आहे.

## प्राप्तीकर चौकशी मंडळाचा अहवाल

### उजेडांत आलेलें उत्पन्न

भारत सरकारनें विचारणा केलेलीं छपविलेल्या उत्पन्नाचीं कांहीं मोठमोठीं प्रकरणें प्राप्तीकर चौकशी मंडळानें १९५१ मध्यें निकालांत काढून त्यावर आपला अहवाल सादर केला आहे. मंडळानें १९५१ मध्यें एकूण १८,१२,२६,९७५ रुपये छुप्या उत्पन्नाचीं ३२४ प्रकरणें निकालांत काढलीं. १९५० मध्यें एकूण ८,११,४२,९८५ रुपये छुप्या उत्पन्नाचीं २३२ प्रकरणें निकालांत काढण्यांत आलीं होतीं. १९५१ हें मंडळाच्या अस्तित्वाचें चौथें वर्ष असून या वर्षअखेर मंडळानें एकूण २९,१५,५३९४४ रुपयांचीं ६६१ प्रकरणें निकालांत काढलीं आहेत.

गेल्या तीन वर्षांतील दर प्रकरणामागें मिळालेल्या उत्पन्नापेक्षां या वर्षांत दर प्रकरणामागें मिळालेल्या सरासरी उत्पन्नावरूनहि यंदाचें यश दिसून येतें. १९५१ मध्यें एकूण ३२४ प्रकरणांमुळें १८·१२ कोटी रुपये छपविलेलें उत्पन्न उजेडांत आल्यानें दर प्रकरणामागें सरासरी ५·५९ लक्ष रुपये पडतात, तर गेल्या तीन वर्षांत दर प्रकरणामागें निव्वळ सरासरी उत्पन्न अनुक्रमें ३·५ लक्ष रुपये, २·८८ लक्ष रुपये व ९४,००० रुपये होतें. छोट्या प्रकरणांची संख्या बरीच असली तरी त्यापासून फार मोठें उत्पन्न उजेडांत येत नसल्यानें छुप्या उत्पन्नाचीं मोठीं प्रकरणें हातीं घेऊन त्यांचा निकाल लावण्याचा घेतलेला निर्णय या वाढीस कारणीभूत आहे. गेल्या चार वर्षांत भारत सरकारनें या मंडळाकडे सोंपविलेल्या एकूण १५४० प्रकरणांपैकीं अवघीं ६६१ प्रकरणेंच निकालांत काढण्यांत आलीं असली तरी राहिलेल्या प्रकरणांमुळें धास्ती बाळगण्याजोगें कांहीं नाहीं. बड्या धेंडांना उत्पन्नाबाबत मेळ बसविण्याकरतां व पुरावा नाहींसा करण्याकरतां वेळ देऊन कमी उत्पन्नदारांमागें ससेमिरा लावणें महसुलाच्या दृष्टीनें अथवा समाजाच्या दृष्टीनेंहि वाजवी ठरलें नसतें.

गेल्या चार वर्षांत जाहीर केलेल्या एकूण २९·१५ कोटी छुप्या उत्पन्नापैकीं जवळजवळ २५·४० कोटी रुपये उत्पन्नाचीं प्रकरणें तडजोडीनें निकालांत काढण्यांत आलीं.

मंडळाकडून चौकशी सुरू असतां त्या कामीं कर भरणारांनीं आणलेले अडथळे आणि वेळ-काढू युक्त्या-प्रयुक्त्यास सीमाच नव्हती. करआकारणीच्या १९३९–४० ते १९४७–४८ या आठ वर्षें कालांतील पुरावा गोळा करणें हें अतिशय बिकट काम होतें. अत्यंत श्रीमंत अशा भारतीय उद्योगपतींत असलेलें आजारीपणाचें मोठें प्रमाण पाहून मंडळास फार आश्चर्य वाटलें. या प्रकरणांतील संबंधित प्रमुख व्यक्तींच्या आजारपणामुळें वारंवार चौकशी तहकूब करण्याची मागणी करण्यांत येते. सुनावणी होण्याचा दिवस पुढें ढकलण्यासाठीं मुद्दाम अडथळे आणल्याचीं अनेक उदाहरणें आहेत.

मंडळानें उजेडांत आणलेल्या प्रकरणांची संख्या व त्यांत गुंतविलेल्या छुप्या उत्पन्नाची मोठी रक्कम लक्षांत घेतां प्राप्ती-कर खात्यानें नित्याचें काम म्हणून कर चुकविण्याच्या चौकशीचें काम हातीं घ्यावें, अशी शिफारस मंडळानें सरकारला सादर केलेल्या आपल्या प्रतिवृत्तांत केली आहे. या मंडळाकडे १९३९ ते १९४७ या मुदतींतील म्हणजेच युद्धकाळांतील छुप्या उत्पन्नाच्या चौकशीचें काम देण्यांत आलें आहे. कर चुकवाचुकवीचीं सर्व अवघड व गुंतागुंतीचीं प्रकरणें निकालांत काढण्यासाठीं इंग्लंड-मधील चौकशी विभागाच्या धर्तीवर मध्यवर्ती महसूल मंडळाच्या कचेरींतच तज्ज्ञांचा समावेश असलेला एक स्वतंत्र विचार सुरू करावा, असें मंडळास वाटतें.


**ठेवी स्वीकारण्यांत येतात**

ठेवींवर दरसाल दर शेंकडा ७॥ रुपये व्याज दिलें जातें. व्याज दर तीन महिन्यांनीं दिलें जातें. ठेवीदारास ठेवीची मुदत संपण्यापूर्वी आपली रक्कम परत पाहिजे असल्यास एक महिन्याच्या आगाऊ नोटिशीनें केव्हांही व्याजासह परत मिळूं शकते.

**पेडणेकर आणि कंपनी लिमिटेड**

शिवण्याच्या यंत्रांचे व्यापारी,

१७२, गिरगांव रोड, मुंबई ४

टेलिफोन ३३७३८ तारेचा पत्ता : 'PEDNECO' Bombay

**दी भारत इंडस्ट्रिअल बँक लिमिटेड**

हेड ऑफिस : पुणें शहर

शाखाः—पुणें लष्कर, बारामती, लोणावळा, श्रीरामपूर (बेलापूर रोड), ओझर (जि. नाशिक)

पे-ऑफिसः—खोपोली (जि. कुलाबा)

श्री. बी. बी. वाळवेकर (अध्यक्ष) | श्री. के. पी. जोशी (उपाध्यक्ष)

अधिकृत भांडवल रु. १५,४३,८१०

विक्री झालेलें भांडवल रु. ७,९३,८१०

वसूल भांडवल रु. ३,९९,३८५

**एकूण खेळतें भांडवल ६३ लाखांचे वर**

सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.

श्री. रा. बा. साळवेकर B. A., LL. B.
श्री. नी. ना. क्षीरसागर
मॅनेजिंग डायरेक्टर.





हें पत्र पुणें, पेठ शिवाजीनगर घ. नं. ९१५।१ आर्यभूषण छापखान्यांत केशव गणेश शारंगपाणी यांनीं छापिलें व श्रीपद वामन काळे, बी. ए. यांनीं 'दुर्गाधिवास', ८२३ शिवाजीनगर (पो. ऑ. डेक्कन जिमखाना) पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.